वर्ष-०७ | अंक-१२ | मुंबई, मंगळवार ०९ ते १५ फेब्रुवारी २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

YouTube

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2
गहुंजे स्टेडियमजवळ अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आल्यामुळे खळबळ

3 → इंडियन नेव्हीच्या अधिकाऱ्याची निर्घुण हत्या

बायकोसोबत तरुण फिरत होता, चिडलेल्या पतीने... ← 4

## सीपीआरमध्ये नर्सिंगच्या विद्यार्थिनीवर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न



कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराज शासकीय महाविद्यालयाच्या नर्सिंग विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर सीपीआरच्या पुरुष परिचारिकाने जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी सकाळी १० च्या सुमारात ओटी विभागात घडली. ...पान २ वर...

## फिल्मी स्टाईलने दोन नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांचे अपहरण



शस्त्राचा धाक दाखवून फिल्मी स्टाईलने दोन नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्याचे अपहरण केल्याची घटना ...पान २ वर...

# नक्की कोणाची चौकशी होणार?

## फडणवीसांच्या टीकेनंतर गृहमंत्र्यांनी ट्वीट करत दिली माहिती



### सेलेब्रिटींच्या ट्वीटच्या चौकशीवरुन भाजपने गृहमंत्री अनिल देशमुख यांना घेरण्याचा प्रयत्न केला

मुंबई, भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, गायसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासह अन्य सेलेब्रिटींनी काही दिवसांपूर्वी शेतकरी आंदोलनावर केलेलं ट्वीट केंद्र सरकारच्या दबावामुळे तर केलं नाही ना, याबाबत आता राज्य सरकारकडून चौकशी करण्यात येणार आहे. मात्र या मुद्द्यावरून भाजपने गृहमंत्री अनिल देशमुख यांना घेरण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आता याबाबत अनिल देशमुख यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.'भारतरत्नाने सन्मानित केलेल्या व्यक्ती आमच्या सगळ्यांसाठी सन्माननीय आहेत. पण त्यांच्यावर कोणत्या भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी दबाव टाकला का? त्या नेत्याची चौकशीची मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे,' असं ट्वीट अनिल देशमुख यांनी केलं आहे.सचिन सावंत यांनीही घेतली सावध भूमिका'भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक आम्ही केलेल्या मागणीचा विपर्यास करून बोंब ठोकत आहे. आम्ही भाजपची चौकशी करावी अशी मागणी केली आहे, सेलेब्रिटींची नाही. उलट सेलेब्रिटींना भाजपपासून संरक्षण द्यावे ही मागणी केली आहे. देशपातळीवर भाजपाकडून लोकशाही मानक पायदळी तुडवले जात आहेत,' असा पलटवार काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी केला आहे. 'काही सेलेब्रेटींवर भाजपा दबाव आणून ट्वीट करावयास भाग पाडू शकतो. काही सेलिब्रिटींच्या ट्वीटमध्ये Amicable हा शब्द समान आहे. सायना नेहवाल आणि अक्षय कुमार यांचे ट्वीट एकाच शब्दात आहेत. सुनील शेट्टीने आपल्या ट्विटरला भाजपा पदाधिकारी हितेश जैन याला टॅग केलं आहे. यातून भाजपा कनेक्शन दिसते. अनेक जणांनी याअगोदर राजकीय ट्वीट कधीच केलं नाही. त्यामुळे त्यांना दबाव आणून भाग पाडले जात आहे का? याची चौकशी आम्ही मागितली आहे. आमच्या विरोधात ही कोणतीही भीती न बाळगता त्यांना बोलता आले पाहिजे. पण जर भाजपा ची भीती असेल तर ती दूर झाली पाहिजे,' असंही सचिन सावंत म्हणाले.

## मंदिराच्या दानपेटीतील रोकड चोरणाऱ्या दुकलीस अटक



ठाणे : पिंपरीगाव येथील केदारेश्वर मंदिराच्या दानपेटीतील रोकड चोरणाऱ्या शरिफ शेख (२५) आणि मोहमंद मुल्ला (२८) या दोघांना डायघर पोलिसांनी मोठया शिताफीने अटक केल्याची माहिती सहायक पोलीस आयुक्त नीता पाडवी यांनी सोमवारी दिली. त्यांच्याकडून ४६ हजार ६७० रुपयांची रोकड हस्तगत केली आहे.ठाणे तालुक्यातील पिंपरी गाव येथील केदारेश्वर मंदिरातील मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून दानपेटीतील ४० हजार ते ४५ हजार रुपये अज्ञात चोरटयांनी ४ फेब्रुवारी रोजी रात्री ८ ते ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान चोरी केली होती. याची तक्रार डायघर पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांच्या माार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप सरफरे आणि भूषण कापडणीस जमादार नाना मोरे, पोलीस नाईक दीपक जाधव, धनंजय आहेर, रतीलाल वसावे, मुकूंद आव्हाड, अंमलदार गणेश सपकाळे आणि महेंद्र बरफ आदींचे पथक गस्त घालीत असतांना केदारेश्वर मंदिर ते तळोजा, खारघर परिसरातील ३० सीसीटीव्हींची त्यांनी तपासणी केली. याच तपासणीमध्ये शरीफ आणि मोहम्मद मुल्ला या दोघांची नावे समोर आली. ...पान २ वर...

## या वर्षाचे राष्ट्रपती पदकाचे मानकरी; पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई व सहायक फौजदार रामदास गाडेकर सन्मानित



भाईंदर: उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती पोलुस दक्षता पथकातील पोलीस निरीक्षक मिलिंद देसाई आणि एम.आय.डी.सी व्हळुज पोलीस ठाण्यातील सहायक फौजदार रामदास गाडेकर यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. मुंबई आर्थिक गुन्हे शाखेचा कार्यभार सांभाळताना देसाई यांनी शेअर मार्केटमध्ये केतन पारेखने केलेला दोनशे कोटींचा घोटाळा उघडकीस आणला होता. अतिरेकी कसाबला सोडवण्यासाठी मुंबई विमानतळावर विमान उडवण्याची धमकी दिली होती. ही धमकी देणा-या आरोपीला गुजरात सुरत मधून त्यांनी अटक केली होती. त्याला सेफ्टी ऑफ सिव्हिलेशन एक्टखाली शिक्षा झाली आहे. ही देशातील पहिली शिक्षा आहे त्यांना आतापर्यंत तिनशे पुरस्काराने सन्मानित केले आहे. गाडेकर १९९० साली पोलीस शिपाई पदावर भरती झाले होते. त्यांनी १५ घरफोड्या, ५ मंगळसूत्र चोरीचे गुन्हे, नकली नोटांच्या प्रकरणात उत्कृष्ट तपास केला आहे. त्यांना प्रर्शसा पत्रे,२८७ पुरस्काराने सन्मानित केले आहे.

## ...आणि पोलीस ठाणे बनले दुसरे घर




मुंबई : घरात एकट्या असलेल्या वृद्धाना सध्या मुंबई पोलिसांचाच आधार असल्याचे चित्र पहावयास मिळते. घरातल्या रेशनिंगपासून गॅस, लाइटबिल, औषध आणण्यासाठी पोलीस त्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेताना दिसत आहे. अशात, त्यांच्यातील नाळ अधिक घट्ट होताना दिसत आहे. विलेपार्लेतील ८३ वर्षीय लेले आजोबासाठी, तर पोलीस ठाणे दुसरे घरच बनले आहे.मुंबईत एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक तसेच वृद्ध आजी आजोबांची माहिती पोलीस दफ्तरी नोंद आहे. अशात प्रत्येक ...पान २ वर...

## पोलीस संचालक महाराष्ट्र राज्य यांची मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयास भेट





दिनांक- १३/९/२०१९ चे शासन निर्णयानुसार पालघर जिल्हा व ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयास मान्यता मिळाली असून प्रत्यक्षात कामकाज दिनांक- १/१०/२०२० रोजी पासून सुरू झाले आहे. आयुक्तालय सुरू झाल्यापासून पोलीस संचालक कार्यालयाकडून आवश्यक मनुष्यबळ, वाहने, अनुदान पुरविण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत.आयुक्तालयाच्या नवनिर्मिती अद्यावत पोलीस नियंत्रण कक्ष, वेबसाईट व परिषद पक्ष यांचे पोलीस संचालकांनी या भेटीत उद्घाटन केले. तसेच आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्याशी संवाद साधला आणि आयुक्तालयाच्या कामाला सर्वंकष आढावा घेतला. पोलीस संचालक, महाराष्ट्र राज्य यांचे आयुक्तालय भेटीच्या दरम्यान अपर पोलीस संचालक (आस्थापना) अपर पोलीस संचालक (नि.व.स) महाराष्ट्र राज्य, पोलीस आयुक्त व अपर पोलीस ...पान २ वर...

## क्रूरता! सार्वजनिक ठिकाणी शिंकल्याने 5 युवकांनी कोविडयोद्धा पोलिसाचं नाक तोडलं अन्



अहमदाबाद – शहरातील २६ वर्षीय लोक रक्षक दलाच्या जवानाने कधी स्वप्नातही विचार केला नसेल की सार्वजनिक ठिकाणी शिंकल्याने त्याचे नाक तोडण्यात येईल, या जवानाने नरोदा पोलीस ठाण्यात ५ युवकांविरोधात तक्रार नोंदवली आहे. ज्यात कोविड काळात सार्वजनिक ठिकाणी शिंकल्याने त्याच्यासोबत शिवीगाळ आणि मारहाण केल्याचा आरोप या जवानाने केला आहे.नरोदा येथे राहणारा युवराज सिंह झाला या २६ वर्षीय युवकाची पोस्टिंग कृष्णानगर पोलीस ठाण्यात ...पान २ वर...

# मीरा रोड सिलेंडर स्फोटानं हादरलं, एकापाठोपाठ 12 सिलेंडरचा स्फोट



मुंबईलगत असलेल्या मीरा रोडमध्ये कमिश्नर ऑफिसच्यामागे घरगुती सिलेंडरचा स्फोट झाला आहे. शांती नगरमध्ये रस्त्यावर मोकळ्या जागेवर घरगुती सिलेंडरच्या टाक्या असलेला टेम्पो पार्क करण्यात आला होता. याच टेम्पोतील एका सिलेंडरचा अचानक स्फोट झाला आहे. हा स्फोट इतका भीषण होता की यामध्ये एकामागोमाग १२ सिलेंडरचा स्फोट झाल्याची दुर्घटना घडली आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ पाचारण केले. अग्निशमन दलाच्या ७ गाड्या २ टँकर आणि ५४ जवान घटनास्थळी दाखल होते. मीरा रोडच्या शांती नगर येथील मोकळ्या मैदानात ही घटना घडली आहे. यामध्ये सिलेंडरच्या २ गाड्या जळाल्या आहेत. रविवारी मध्यरात्री २ वाजता आग लागली असून पहाटे ३ च्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश मिळाले आहे.

मीरा रोडमध्ये गडद अंधार असताना १२ सिलेंडरचा स्फोट झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सेंट पॉल शाळेच्या बाजूला, सुरबी जीम समोर, राम नगर, मिरा रोड(पू.) येथे मोकळ्या मैदानात उभ्या असलेल्या एक टेम्पो १)MH ४३ Y ९१४१ व एक ट्रक २) MH ०४ FT १२६३ मधील घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन आग लागली होती.तसेच बाजूला पार्क केलेल्या MH ०४ GR ०८९३ या पिकअप वाहनाला देखील आग लागली होती.

या सिलेंडरच्या स्फोटात एकूण १२ सिलेंडरचा स्फोट झाल्याने मीरा रोड हादरले आहे. एकामागोमाग एक असा सिलेंडरचा ...पान २ वर...

## BMC कर्मचारी असल्याची थाप मारुन ब्रिटिशकालीन वडाचं झाड छाटलं! 5 जणांना अटक

रस्त्याच्या कडेला जाहिरातीच्या बॅनरचे जास्त पैसे मिळावे म्हणून मंगळवारी रात्री काही लोकांनी गिरगाव चौपाटी जवळ असलेल ब्रिटिश कालीन वडाच झाड कापल्याचा प्रकार उघडकीस आला. स्थानिकांनी जेव्हा त्यांना याबद्दल विचारणा केली तेव्हा त्यांनी आपण महानगरपालिकेचे कर्मचारी असल्याच सांगितले आणि हे झाड कापण्यासाठी महानगर पालिकेने परवानगी दिली असल्याचेही बतावणी त्यांच्याकडून करण्यात आली. स्थानिकांनी या प्रकरणाच ट्विट उद्धव ठाकरे यांना केलं आणि याची दखल खुद्द पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी घेतली. आदित्य ठाकरे बुधवारी दुपारी स्वतः झाड कापलेल्या ठिकाणी पोहोचले आणि त्यांनी सर्व परिस्थितीचा आढावा घेतला. स्थानिकांनी घडलेला सर्व प्रकार आदित्य ठाकरे यांना सांगितला त्यानंतर

### परिसरातून अटक

पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे हे

**झाड कापल्याची घटना घडल्या नंतर दुसऱ्या दिवशी आदित्य ठाकरे यांनी स्वता घटनास्थळी जाऊन केली होती पाहणी.**



महानगरपालिकेला विचारणा केल्यावर महानगरपालिकेने असे कुठलेही आदेश दिले नसल्याचा स्पष्ट केलं आणि झाड कापणारी हे लोकं महानगरपालिकेचे कर्मचारी नव्हते हे सुद्धा लक्षात आलं.

पोलिसांकडून ५ जणांना माहीम जातीने या प्रकरणात लक्ष घालत असल्यामुळे पोलिसांनी तात्काळ या संदर्भात गुन्हा नोंदवला आणि युद्धपातळीवर याचा तपास सुरू केला. यावेळी एक तपास पथक बनवण्यात आलं आणि त्यांनी हे झाड ...पान २ वर...

# गहुंजे स्टेडियमजवळ अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आल्यामुळे खळबळ

**पहाटे मंदिराकडे जाणाऱ्या पायवाटेवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अज्ञात व्यक्ती आढळून आला. त्यामुळे एकच खळबळ उडाली होती.**



तळेगाव, : पुणे जिल्ह्यातील तळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या गहुंजे स्टेडियमजवळ एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्यामुळे खळबळ उडाली आहे. या तरुणाचा घटनास्थळी खून करण्यात आला की मृतदेह इथं आणून टाकला, याचा तपास पोलीस करत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गहुंजे स्टेडियमजवळ असलेल्या घोरवडेश्वर डोंगराच्या पायथ्याला 25 ते 30 वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आज पहाटे आढळून आला. घोरवडेश्वर डोंगरावर दर्शनासाठी तसंच व्यायाम करण्यासाठी पहाटेच्या वेळेस डोंगर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी असते. दरम्यान, पहाटे मंदिराकडे जाणाऱ्या पायवाटेवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अज्ञात व्यक्ती आढळून आला. त्यामुळे एकच खळबळ उडाली होती. स्थानिक नागरिकांनी या घटनेबद्दल तात्काळ तळेगाव पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेत पाहणी केली आणि मृतदेह ताब्यात घेतला. निळया रंगाची जीन्स पॅन्ट तसंच पिवळया रंगाचा शर्ट घातलेल्या अंदाजे 25 ते 30 वर्षीय इसमाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची बाब तपासात पुढे आली आहे. तपासादरम्यान मयताच्या गळयावर एक रुपयाचे नाणे आढळून आल्याने पोलीस या संदर्भात अनेक तर्कवितर्क लावू लागले आहेत.

तसंच मयत इसम हा मजूर असल्याची प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. डोंगर पायथ्या लगत असलेली सदरची जागा ही वन विभागाच्या अखत्यारित असल्याने प्रतिबंधित क्षेत्र म्हणून वन विभागाकडून घोषित करण्यात आले आहे तरी देखील सायंकाळच्या वेळेस हुल्लडबाजांचे टोळके

# सरकारी कार्यालयात दिली शिंक, पोलीस कर्मचाऱ्याला बेदम मारहाण



अहमदाबाद, गुजरातच्या अहमदाबादमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अहमदाबादमध्ये पोलीस कर्मचाऱ्याला बेदम मारहाण करण्यात आली आहे. सरकारी कार्यालयात शिंक दिली म्हणून पाच युवकांनी या पोलीस कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली आहे. याप्रकरणी रक्षक दलाच्या 26 वर्षीय जवानाने पोलिसात तक्रार दाखल केली आहे. यानंतर नरोडा पोलिसांनी पाच जणांविरोधात मारहाण आणि शिव्या दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा पोलीस जवान सरकारी कामकाजानिमित्त सरकारी कार्यालयात आला होता. यावेळी त्याठिकाणी त्याला शिंक आली. यानंतर त्याठिकाणी असणाऱ्या दोन युवकांनी त्याला शिव्या देत मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानं आपण पोलीस असून सरकारी कामकाजानिमित्त आल्याचं सांगितलं. परंतु, आरोपींनी त्याचं काहीही ऐकून न घेता आपल्या आणखी 3 साथीदारांना बोलवत आणखी मारहाण केली. शिंक ही अशुभ असल्याचं म्हणत आरोपींनी मारहाण केल्याचं मारहाण झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यानं सांगितलं. याठिकाणी उपस्थित असणाऱ्या नागरिकांनी आरोपींच्या तावडीतून या पोलीस कर्मचाऱ्याची सुटका केली. यामध्ये या कर्मचाऱ्याच्या नाकाला मोठी इजा झाली आहे, तर डोळयालादेखील गंभीर दुखापत झाली आहे. सध्या त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहे. अहमदाबाद मिररला दिलेल्या मुलाखतीत, नाकाला मोठी दुखापत झाली असून डोळ्याजवळ टाकेदेखील पडले असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. दरम्यान, पोलिसांनी याप्रकरणी भारत भारवाड, विपुल भारवाड, संजय भारवाड, रवि भारवाड आणि जगदीश भारवाड या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याचबरोबर पुढील तपास सुरु असल्याची माहितीही पोलिसांनी दिली आहे.

# 'अल्लाह'च्या नावाखाली शिक्षिकेनं केली पोटच्या 6 वर्षीय मुलाची हत्या

**मदरसामधील एका 30 वर्षीय महिला शिक्षिकेनं स्वतःच्याच सहा वर्षांच्या मुलाची गळा कापून हत्या केली.**



पलक्कड, केरळच्या पलक्कडमधून एक संतापजनक घटना समोर आली आहे. मदरसामधील एका 30 वर्षीय महिला शिक्षिकेनं स्वतःच्याच सहा वर्षांच्या मुलाची गळा कापून हत्या केली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ही महिला गर्भवती आहे. तिनं पोलिसांना सांगितलं, की अल्लाहला खूश करण्यासाठी तिनं आपल्या मुलीची हत्या करत कुर्बानी दिली. या घटनेनंतर महिलेनं स्वतःच पोलिसांनी याबद्दलची माहिती दिली. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ही घटना रविवारी पहाटे 4 वाजता घडली. हत्या करण्यात आलेला मुलगा हा महिलेच्या तीन मुलांमधील सर्वात लहान होता आणि तिच्यासोबतच झोपला होता. महिलेनं रात्रीच मुलाला झोपेतून उठवलं. ती मुलाला वॉशरूमच्या बहाण्यानं घेऊन गेली आणि हत्येच्या आधी त्याचे पाय बांधले. महिलेचा पती आपल्या इतर दोन मुलांसह दुसऱ्या खोलीत झोपला होता. पोलिसांच्या माहितीनुसार,पुथुपल्लीथिरुवची रहिवासी असलेल्या या महिलेनं आपल्या मुलाची हत्या केल्यानंतर पहाटे 4 च्या सुमारास एमरजेंसी कंट्रोल रुमला फोन करत आपला गुन्हा स्वतःच सांगितला. पोलिसांनी तिनं सांगितलं, की अल्लाहला कुर्बानी म्हणून तिनं आपल्या 6 वर्षांचा मुलगा आमिलची हत्या केली.

# पिंपरीतील बेपत्ता असलेल्या व्यावसायिकाची अपहरणानंतर हत्या



पिंपरी, पिंपरीतून बेपत्ता झालेल्या एका व्यावसायिकाचा मृतदेह रायगडमधील महाड येथे सापडला आहे. 4 फेब्रुवारी रोजी ते बेपत्ता झाले होते. या व्यावसायिकाच्या भावाने ते बेपत्ता झाल्याची तक्रार पिंपरी पोलीस ठाण्यात दाखल केली होती. पिंपरी पोलिसांकडून याप्रकरणी तपास सुरू असतानाच, त्यांचा मृतदेह सापडल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे.

पिंपरीतील या व्यावसायिकाचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. आनंद साहेबराव उनवणे असं मृत्यू झालेल्या व्यावसायिकाचं नाव आहे. त्यांचा चिटफंडचा व्यवसाय होता. 45 वर्षीय आनंद उनवणे गुरुवारपासून बेपत्ता झाल्याने तशी तक्रार दाखल करण्यात आली.

त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या मोबाईल कॉल डिटेल्सवरून तपास करण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान आनंद यांचा मृतदेह शनिवारी रायगडमधील महाड येथे पाण्यात आढळला.

आनंद यांचं अपहरण, हत्या कोणी केली याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळू शकलेली नाही. महाडमध्ये मृतदेह आढळल्यानंतर त्याबाबत पिंपरी पोलिसांना माहिती देण्यात आली आणि बेपत्ता झालेल्या आनंद यांचाच मृतदेह असल्याची ओळख पटली आहे.

# व्हॅलेंटाईनला सुरुवात होताच मुंबई हादरली, प्रियकराने प्रेयसीला पेटवले



मुंबई, एकमेकांवर प्रेम व्यक्त करण्यासाठी खास अशा व्हॅलेंटाईन विकची सुरुवात झाली आहे. तर दुसरीकडे एका प्रियकराने आपल्या प्रेयसीला जिवंत जाळल्याची घटना मुंबईतील जोगेश्वरीमध्ये घडली आहे. धक्कादायक म्हणजे, पेटलेल्या अवस्थेत प्रेयसीने प्रियकराला मिठी मारली, त्यामुळे प्रियकराचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील जोगेश्वरी भागातील मेघवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गांधीनगर परिसरात ही थरकाप उडवणारी घटना घडली आहे. विजय खांबे (वय 30) असं मृत तरुणाचे नाव आहे. विजयचे आपल्या मेव्हण्याच्या धाकडया बहिणीशी गेल्या अडीच वर्षांपासून प्रेमसंबंध होते. विजयला त्याच मुलीशी लग्न करायचे होते. यासाठी त्याने लग्नाचा प्रस्ताव देखील मुलीच्या कुटुंबीयांना पाठवला होता. पण, त्याचा हा प्रस्ताव मुलीच्या आई-वडिलांनी फेटाळून लावला. विजयला दारू पिण्याचे व्यसन जडले होते. त्यामुळे काही दिवसांनी मुलीनेही विजयशी लग्न करण्यास नकार दिला होता.

विजयने पीडित मुलीला लग्न करण्यास हट्ट करत होता, त्यामुळे तो तिला त्रास देत होता. विजयच्या त्रासाला कंटाळून पीडितेनं एकेदिवशी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. रुग्णालयात आठवडाभर उपचार घेतल्यानंतर पीडित घरी आली होती. त्यावेळी विजय पुन्हा तिला भेटण्यासाठी गेला होता. त्याने आपल्यासोबत पेट्रोलची बाटली आणली होती. पीडित घरी एकटीच असल्यामुळे विजयने संधी साधून घरात प्रवेश केला. विजय आणि पीडितेमध्ये पुन्हा वाद झाला. त्यानंतर त्याने आपल्यासोबत आणलेली पेट्रोलची बाटली पीडितेच्या अंगावर ओतली पेटवून दिले. तरुणीने जिवाच्या आकांताने आरडाओरडा करत होती, पण विजय हा दारातच उभे राहून सर्व पाहत होता. काही वेळानंतर तरुणीने पळत जात विजयला मिठी मारली. विजयने स्वत:ला सोडवण्याचा प्रयत्न केला पण तरुणीने त्याला काही सोडले नाही. दोघेही पेटलेल्या त्याच अवस्थेत घराच्याबाहेर आले आणि कोसळले. त्यानंतर शेजाऱ्यांनी धाव घेऊन आग विझवली. दोघांनाही तातडीने जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आगीत होरपळून विजय 90 टक्के भाजला होता. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. तर पीडित तरुणीची प्रकृती चिंताजनक असून मृत्यूशी झुंज देत आहे.

# मुलीकडे बघणाऱ्यास सक्तमजुरीची शिक्षा



औरंगाबाद, तेरा वर्षीय विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिच्याकडे वाईट नजरेने एकटक बघणाऱ्या ३७ वर्षीय तरुणाला सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा विशेष न्यायाधीश ए. एस. खडसे यांनी शुक्रवारी सुनावली. दामोदर कन्हैया राबडा, असे त्याचे नाव आहे.

तो सिडकोतील एन-७ भागातील रहिवासी आहे.

फिर्यादी अल्पवयीन मुलगी ४ मे २०१७ रोजी व्यंकटेशनगर येथील घरातून समोरील उद्यानामध्ये सायकल खेळण्यास गेली होती. आरोपी तिच्याकडे एकटक पाहात होता. शालेय साहित्य आणण्यासाठी फिर्यादी जात असतानाही तो पाठलाग करायचा.

एके दिवशी मामाच्या घरी जात असतानाही आरोपी मागे आला व बाहेर उभा राहून पाहात होता. त्याबाबतची माहिती तिने मामाला दिली.

मामाने व इतरांनी त्याला जिन्सी पोलिस ठाण्यात नेले. तेथे तक्रारीवरून पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल झाला होता.

या प्रकरणी विशेष सरकारी वकील ज्ञानेश्वरी नागुला यांनी सहा साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्याआधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. यामध्ये फिर्यादीची व घटनेतील प्रत्यक्षदर्शींची साक्ष महत्त्वाची ठरली. न्यायालयाने त्याला सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा व दहा हजारांचा दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

## पृष्ठ १ वरुन

### सीपीआरमध्ये नर्सिंगच्या विद्यार्थिनीवर

या घटनेने सीपीआरमध्ये खळबळ उडाली आहे.या घटनेची माहिती पीडित विद्यार्थिनीने आपल्या आई-वडिलांनी दिली. ते सकाळी सोलापूरहून तातडीने कोल्हापुरात दाखल झाले. त्यांनी घडलेल्या प्रकाराची माहिती सीपीआरचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. मोरे आणि परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिली.ज्यावेळी हा प्रकार घडला त्यावेळी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी संशयिताला चोप दिला. दरम्यान, या घटनेनंतर पीडित विद्यार्थ्यांनीला अस्वस्थ वाटू लागल्याने तिला सीपीआर दाखल करण्यात आले आहे. तिच्यावर तिथे उपचार सुरु आहे. या प्रकरणी सीपीआर पोलिस चौकीत गुन्हा नोंद झाला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.दरम्यान, सीपीआरमध्ये घडलेली ही घटना गंभीर स्वरुपाची आहे. अशा गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत. संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे सीपीआरचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. मोरे यांनी म्हटले आहे.

### फिल्मी स्टाईलने दोन

राजगुरूनगर येथील खेड घाटात घडली आहे. याबाबत विठ्ठल भाऊसाहेब कवाद (रा. निघोज ता.पारनेर जि. अहमदनगर यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या घटनेबाबत सविस्तर माहिती अशी की,पारनेर तालुक्यातील निघोज गावातील नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य राजकिय सहलीसाठी गेले होते. ७ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास जेवण्यासाठी खेड घाटाच्या वरती माळेगाव ( ता खेड ) येथील पुणे -नाशिक महामार्गालगत हॉटेल सुर्यकांता खानवळीत थांबले होते. दरम्यान सदस्य आणि काही गावकरी ओतूर येथे देवदर्शनासाठी जात असताना सचिन मच्छिंद्र वराळ, मंगेश सखाराम वराळ, सुनिल मच्छिंद्र वराळ, निलेश राजु घोडे, अजय संजय वराळ, राहुल भाऊसाहेब वराळ, स्वप्निल भाऊसाहेब दुनगुले, सुभाष आनंदा वराळ, आकाश विजय वराळ, धोंडीभाऊ जाधव हे सर्व (रा. निघोज,ता. पारनेर , जि, अहमदनगर ) व इतर १५ते २० जणांनी ग्रामपंचायत सरपंचपदाच्या कारणावरून फिर्यादीला काठीने मारहाण केली. शिवीगाळ व धमकी देऊन तलवारीची व लोखंडी रॉडचा धाक दाखवून दिगंबर भागाजी लाळगे, आणि गणेश दत्तू कवाद या दोन नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांना बळजबरीने स्कॉर्पिओ गाडीत घातले. फिर्यादीचे मोबाईल हिसकावून जमिनीवर आपटून नुकसान करण्यात आले. दोन सदस्यांना घेऊन त्यांचे अपहरण करण्यात आले..या प्रकरणी निघोज गावातील २५ जणांवर खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास खेड पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलिस निरिक्षक भारत भोसले करित आहे.

### मंदिराच्या दानपेटीतील रोकड

त्यांना ५ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान ताब्यात घेतले. सखोल चोकशीत त्यांनी या चोरीची कबूली दिली. त्यांच्याकडून दानपेटीतील चोरलेली ४६ हजार ६७० रुपयांची रोकड, घरफोडीसाठीची हत्यारे आणि रिक्षा असा मुद्देमाल जप्त केला. यातील शरीफ याला ८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे तर मुल्ला याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश ठाणे न्यायालयाने दिले आहेत.

### BMC कर्मचारी असल्याची थाप मारुन

कापणाऱ्यांचा शोध सुरू केला. शेवटी पोलिसांना यश आलं आणि शनिवारी पोलिसांनी ५ लोकांना माहीम परिसरातून अटक केली. हिरालाल सेवकराम दर्शन वय ३६ आणि मोहम्मद शफीक उर्फ अब्दुल इकबाल वय २५ अशी पाच पैकीं दोन आरोपींची नावं असल्याचे समोर आले आहे.

बॅनर लावल्यानंतर हे झाड मध्ये येत होतं ज्यामुळे पैसे कमी मिळत होते आणि म्हणून हे झाड कापल्याची माहिती या लोकांनी दिली. फक्त हेच झाड नाही तर मुंबईमध्ये अशी अनेक झाडं या लोकांकडून कापण्यात आल्याचं ही या लोकांनी मान्य केलं आहे. मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांचा निवासस्थान असलेल्या मलाबार हिल परिसरामध्ये सुद्धा या लोकांनी अशाच प्रकारे झाडं कापल्याच समोर आले असून मलबारहिल पोलीस स्टेशन मध्ये सुद्धा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशाप्रकारे झाड कापत असताना जर कोणी यांना या बाबत विचारलं तर हे स्वतःला महानगरपालिकेचे कर्मचारी सांगायचे. त्यामुळे पोलिसांना ही कधी यांचा संशय आला नाही. मात्र हा सर्व प्रकार ते कोणाच्या सांगण्यावरून करत होते याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. सह पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, अतिरिक्त पोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी, पोलीस उपायुक्त राजीव जैन, सहाय्यक पोलीस आयुक्त राजेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण मांढरे, पोलीस हवालदार विजय आवकीकर, आणि पोलीस शिपाई बळीराम मोरे या पथकाद्वारे ही कारवाई करण्यात आली.

### क्रूरता! सार्वजनिक ठिकाणी शिंकल्याने 5

करण्यात आली होती, तो अकाऊंट विभागात कार्यरत होता, कामाच्या संबंधित तो विभागीय कार्यालयात गेला होता, ज्याठिकाणी त्याच्यासोबत हा प्रकार घडला, काम संपल्यानंतर तो ऑफिसमधून बाहेर निघाला तेव्हा सिडीवरून उतरताना त्याला अचानक शिंक आली, त्यानंतर हा प्रकार घडला. जवळ उभे असणाऱ्या २ लोकांनी त्याच्यासोबत वाद घालत त्याला मारहाण करण्यास सुरूवात केली, झाला ने या युवकांना मी पोलीस कर्मचारी आहे आणि कामानिमित्त याठिकाणी आलोय हे सांगितले, ही गोष्ट ऐकून युवक आणखी भडकले त्यांनी आपल्या ३ साथीदारांना बोलावून घेतलं, त्यानंतर या ५ जणांनी मिळून युवराज सिंह झालाला प्रचंड मारहाण केली, शिंक आल्यामुळे या युवकांनी पोलिसाला बेदम मारलं, त्याठिकाणी उपस्थित लोकांनी कसंतरी आरोपींच्या तावडीतून पोलिसाला वाचवलं.या घटनेनंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले, ५ आरोपींविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. भारत भारवाड, विपुल भारवाड, संजय भारवाड, रवि भारवाड आणि जगदीश भारवांड असं या आरोपींचे नाव असून त्यांच्याविरोधात गुन्हा नोंद झाला आहे. या मारहाणीत युवराज सिंह झाला यांच्या नाकाला आणि डोळयाला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या मारहाणीत नाक फ्रॅक्चर झालं असून डोळयाजवळ टाके बसले आहेत. सध्या पीडित पोलिसाच्या तब्येतील डॉक्टरांची नजर आहे.

### मीरा रोड सिलेंडर स्फोटानं

स्फोट होत होता. आगीचे लोळ उंच उंच उडत होते. स्फोट झाल्याने १ नागरिक जखमी झाला आहे. परंतु कोणतीही जिवितहानी झाली नसल्याचे समजते आहे. स्फोट झाल्याच्या ठिकाणी नेहमी सिलेंडरच्या गाड्या उभ्या असायच्या तसेच इतर वाहनही पार्क केली जात होती. अशी माहिती

### पोलीस संचालक महाराष्ट्र राज्य

आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण, पोलीस अधीक्षक, पालघर आणि आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते. पोलीस संचालकांनी पहिल्या चार महिन्यात आयुक्तालयाची घडी बसविण्याकामी चांगली कामगिरी केली आहे, याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच पोलीस संचालकांनी आयुक्तालयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती चांगली राखली पाहिजे, गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवले पाहिजे, वाहतूक व्यवस्थेकडे लक्ष दिले पाहिजे, समाजातील असामाजिक तत्त्वांवरती अंकुश ठेवला पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. नवनिर्मित आयुक्तालयास मनुष्यबळ पुरविणे व इतर मदत करणे बाबत पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण व पोलीस अधीक्षक, पालघर यांना पोलीस संचालकांनी सूचना दिल्या. नवनिर्मित पोलीस आयुक्तालयाची घडी बसविण्यासाठी महाराष्ट्र पोलीसांच्या वतीने आवश्यक ती मदत केली जाईल याबाबत पोलीस संचालक, महाराष्ट्र राज्य यांनी आश्वस्त केले आहे.

### ...आणि पोलीस ठाणे बनले दुसरे घर

पोलीस ठाण्याअंतर्गत त्यांच्या भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या भेटीगाठी तसेच त्यांच्या प्रत्येक कॉलला मुंबई पोलीस धावून जाताना दिसत आहे.विलेपार्ले पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेन्द्र काणे यांनी नवीन वर्षानिमित्त कॉर्नर मिटिंग सुरू केल्या आहेत. त्यांच्या बैठकीला विलेपार्ले करांचाही भरघोस प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या बैठकीअंतर्गत ते ज्येष्ठ नागरिकांची होणारी फसवणूक आणि महिला संबंधित अत्याचारावर विशेष जनजागृती करत आहेत. यात गुन्हा कसा घडतो? त्यावर कशा पद्धतीने नियंत्रण आणता येईल याबाबत ते मार्गदर्शन करत आहेत. आता पर्यंत एकूण ७३ मिटिंग पार पडल्या आहेत.अशातच विलेपार्ले परिसरात एकटे राहणाऱ्या ८३ वर्षीय लेले आजोबांसाठी पोलीस ठाणे जणू दूसरे घरच बनले आहे. काणे सांगतात, २००५ मध्ये लेले आजोबांसोबत ओळख झाली. घरात एकटे असल्याने पोलिसांसोबत गप्पा मारणे हा त्यांचा दिनक्रमच. अशात कधी त्यांची बोलण्याची इच्छा झाली की मी घरी जातो. किंवा त्यांना पोलीस ठाण्यात घेउन येण्यासाठी गाडी पाठवितो. तास, दोन तास त्यांच्या गप्पांमध्ये जातात आणि ते आता माझ्या वडिलांसारखेच झाल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार ०९ ते १५ फेब्रुवारी २०२१

संपादकीय...



## कोरोनामुळे अस्वस्थ होण्यासारखं काय आहे?

एकदा आत्मा सैतानाला विकल्यानंतर सैतानाचं अस्तित्व आपल्याला अस्वस्थ कसं करू शकतं? आपली छत्रछाया जाणार आहे, यापुढं उन्हात जळावं लागणार आहे हे झाड तोडण्याआधीच माहिती असतं. माहित असलं पाहिजे! दगड, कुऱ्हाड, बंदूक, अणूबॉम्ब, रेल्वेच्या रुळांइतकाच कोविड निर्जीव असतो असं म्हणतात. आणि दगड, कुऱ्हाड, बंदूक, अणूबॉम्ब, रेल्वेच्या रुळांनी जगभरात केवढा हैदोस घातला त्यापेक्षा कोविडने कमीच घातलाय. असंही म्हणतात की कोविड सायन्सची देणगी आहे. ज्याप्रमाणे ट्रेन, कार, विमानं, कारखाने, प्लास्टिक, इमारती, औषधं, हवापाण्याचं प्रदूषण, ओझोन लेअरचं भोक, समुद्राची वाढणारी उंची, नष्ट होणारे किनारे, नाहीशा होणाऱ्या असंख्य जिवांच्या प्रजाती, कोलेस्ट्रॉल, शुगर, कॅन्सर वगैरे वगैरे. मग कोविडमध्ये नवं असं काय आहे? अनेक कादंबऱ्यांत, चित्रपटांत, मालिकांत कोविड येण्याआधी कित्येक वर्षे तत्सम 'प्लेग'ची नांदी होतंच होती. एकाकी मरण ही कोविडची सगळ्यांत भयंकर बाजू म्हणतात. पण विभक्त कुटुंबातले वृद्ध, परदेशी गेलेले तरूण, मुंबईच्या लोकलमधून पडणारी मुलं काय वेगळी मरतात?अस्वस्थ होणारे अस्वस्थ होतात कारण



त्यांना अस्वस्थ व्हायची आवड असते. पूर्वी शाळेत जायचा कंटाळा आला की मुलांच्या पोटात दुखायचं. तसं ज्यांना काहीही करायचं नसतं ते अस्वस्थ होतात. पांडवांनी राज्य मागितलं म्हणून काही जण अस्वस्थ होते. कौरवांनी त्यांना राज्य दिलं नाही म्हणून काही अस्वस्थ झाले. पहिल्या महायुद्धानंतर अस्वस्थ होणाऱ्यांना वाटलं की नंतर असं युद्ध मांडण्याची इच्छाच कोणाला होणार नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांना वाटलं हिरोशीमा-नागासाकी नंतर अणुबॉम्ब कोणी करू धजणार नाही. अणुबॉम्बच्या स्फोटामुळे अस्वस्थ झालेले आत्मे कधीच देवाघरी गेले. आपण शेकडो अणुबॉम्बसोबत आपापल्या घरात सुखेनैव जगतोय. मग नुसत्या कोविडने आपण का अस्वस्थ व्हावं? ज्या उपेक्षितांना, बेकार, भणंग, कंगालांना, गोरगरीब खेडुतांना व्यवस्थेने आधुनिक सुखसोयी-सुविधांपासून वंचित राहाण्यास भाग पाडलं त्यांच्याशी हा निर्जीव कोविड आश्चर्यकारक आपुलकीनं वागला. आयुष्यभर अनवाणी चालावं लागणाऱ्या माणसांच्या पावलांवर जसं दगडही प्रेम करतात तसं कोविडनं या आत्मा न विकलेल्या माणसांवर प्रेम केलं यात अस्वस्थ होण्यासारखं काय आहे?'आत्मा विकणं' ही काही काल्पनिक प्रक्रिया नाहीय. स्वत:ची बायको, आईबाप, मुली विकणं यापेक्षा आत्मा विकणं अधिक ठोस सत्य आहे. समुद्राचा आत्मा त्याची गाज असते तसा माणसाचा आत्मा त्याच्यातला निसर्ग असतो. आजकाल माणसाचा जन्मच निसर्गाशी फारकत घेत होतो. मग आयुष्यभर आधुनिक सुखसोयींसाठी निसर्गाची वाताहत करत तो स्वत:चा आत्मा कणाकणाने सैतानाला विकत राहातो. संपूर्ण नष्ट होईपर्यंत. आपण जन्माला आल्यापासून ज्या सैतानाच्या उपकारांवर जगतो त्या सहस्रावधी चेहऱ्यांच्या या उपकारकर्त्याचा 'कोविड' हा फक्त एक चेहरा आहे. मग उर्वरित सहस्रावधी चेहरे ज्या विनम्रपणे आपण स्वीकारले त्याच विनम्रपणे कोविडला शरण न जाता आपण अस्वस्थ का व्हावं?कोविडमुळे का कोणाला व्हल्नरेबल, असहाय, एकाकी वाटावं?माणूस व्हल्नरेबल, असहाय, एकाकी नव्हता कधी? जोपर्यंत एखाद्याचं सारं सुरळित चालू असतं, त्याची कोणाकडूनही काही अपेक्षा नसते, तोर्यंतच तो व्हल्नरेबल, असहाय, एकाकी नसतो. ज्यांना कोविडच्या काळातच ते व्हल्नरेबल, असहाय, एकाकी असल्याची जाणीव झाली असेल ते खरोखरच नशीबवान. कारण कोविड येईपर्यंत त्यांना त्याची जाणीवही होऊ नये एवढं सुखासीन आयुष्य ते जगत होते. - आणि त्यांचं वैचारिक दारिद्'य एवढं भयंकर की कोविडच्या काळात त्यांना तसं काही जाणवू नये म्हणून स्वत:च्या जिवावर उदार झालेले अगणित कार्यकर्ते, पोलीस, डॉक्टर, कर्मचारी, विक्रेते आणि असंख्य सेवक त्यांना दिसू नयेत. एवढे ते आत्मकेंद्री. त्यांची कोविडने थोडी कोंडी केली म्हणून कोणी का अस्वस्थ व्हावं?जसे ग्रीक आले गेले. मग तुर्क, अफगाण, मोगल, मंगोल, शक, कुशाण आले-गेले, राहिले-रिचले. तसाच कोविड आला. थोडा राहिल, थोडा जाईल, थोडा रिचेल. दोन्ही महायुद्धात इंग्लंड वाचवण्यासाठी लढताना लाखो भारतीयांनी मरण पत्करलं. कोणी काही बोलतं त्यांच्याबद्दल? दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांच्या जिभेचे चोचले पुरवायला भारतात इंग्रजांनी निर्माण केलेल्या कृत्रिम दुष्काळात किती लाख भारतीय मृत्यूमुखी पडले याचे आकडे अमर्त्य सेनांनी ओरडून सांगितले. ते आहेत कुठल्या पाठ्यपुस्तकात? आजच्या आपल्या इतिहासात जसा आणि जेवढा ब्रिटिशांचा कोविडसम इतिहास आहे तसा आणि तेवढाच आत्ताच्या कोविडचा राहिल. समुद्र पार करणाऱ्या जहाजावर एक कप्तान असतो. त्याशिवाय अधिकारी, खलाशी, उंदीर आणि झुरळंही असतात. पण जहाज चालतं ते फक्त कप्तानाच्या आदेशानुसार. ते सात समुद्र पार करतं, असंख्य किनारे गाठतं किंवा भरकटून, आदळून, फुटून बुडतं तेही कप्तानाच्या आदेशामुळे. पण ते जहाजावरल्या प्रत्येकाच्या कर्माचं फळ असतं. कर्म जहाज निवडण्याचं, सैतानाचा चेहरा निवडण्याचं, स्वत:चा आत्मा विकण्याचं. बुद्ध, झेन, गीतेतलं तत्त्वज्ञान हेच सांगतं.

# वाटणी की...?

### 15 व्या वित्त आयोगाने महसूल वाटपात बदल न केल्याने आहे त्या व्यवस्थेत सातत्य राहीलही; पण त्याच वेळी राज्यांच्या महसूलवृद्धीच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होणारच नाही असे नव्हे...

**महाराष्ट्र आदी राज्यांच्या तुलनेत केंद्राकडून तुलनेने गरीब राज्यास सढळहस्ते मदत होते, हे सत्य. परिस्थिती उत्तम असताना याबाबत कोणी फारशी कुरकुर करीत नाही. काटकसरीची वेळ आल्यास मात्र लगेच तुझे-माझे सुरु होते. वस्तू/सेवा कराबाबत सध्या जी तक्रार होते, त्यास ही पार्श्वभूमी आहे...**

अर्थसंकल्पाच्या चमचमाटात एक महत्त्वाचा विषय तुलनेने दुर्लक्षित राहिला. तो म्हणजे अर्थसंकल्पाच्या दिवशीच सादर झालेला वित्त आयोगाचा अहवाल. केंद्र आणि राज्ये यांतील अर्थसंबंध कसे असावेत हे निश्चित करण्याची जबाबदारी वित्त आयोगाची. कायदामंत्रिपदी असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५१ साली पहिल्या वित्त आयोगाची निर्मिती केली. सध्या कार्यरत असलेला वित्त आयोग हा १५ वा. भारतासारख्या संघराज्यात केंद्र आणि राज्य यांच्यात महसुलाची वाटणी कशी करावी, कोणत्या राज्यास किती आणि का महसूल मिळावा आणि यांत मतभेद झाले तर ते कसे सोडवावेत, हा या वित्त आयोगनिर्मितीमागील विचार. के. ब्रह्मानंद रेड्डी, यशवंतराव चव्हाण, सी. रंगराजन, विजय केळकर, वाय. व्ही. रेड्डी अशा तज्ज्ञांनी भूषवलेल्या या वित्त आयोगाच्या प्रमुखपदी २०१७ साली ज्येष्ठ नोकरशहा नंद किशोर ऊर्फ एन. के. सिंग यांची नियुक्ती केली गेली. सुरुवातीच्या घोषणेनुसार या आयोगाचा अहवाल १ एप्रिल २०२० साली अपेक्षित होता. तसे झाले नाही. काहीशा विलंबानंतर गेल्या आठवड्यात तो सादर झाला.याआधीच्या वित्त आयोगाचे प्रमुख, रिझव्ह बँकेचे माजी गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांनी १४ व्या आयोगात केंद्र सरकारने आपल्या कर महसुलातील ४२ टक्के इतका वाटा राज्यांत वाटला जावा, अशी शिफारस केली. त्यानंतरच्या कालखंडात महत्त्वाचा बदल म्हणजे 'वस्तू/सेवा कर' अर्थात 'जीएसटी'. या कराने देशातील राज्यांहातीचे करास्त्र पूर्णपणे काढून घेतले. परिणामी आपल्या हक्काच्या उत्पन्नासाठी केंद्रावर अवलंबून राहण्याची वेळ राज्यांवर आली. या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्ये यांच्यातील महसुलाचे वाटप कसे व्हावे हे ठरवणे वित्त आयोगासमोरील अवघड आव्हान होते. ते पेलताना सिंग यांच्या आयोगाने रेड्डी यांनी ठरवून दिलेले महसूल वितरणाचे प्रमाण होते तसेच ठेवले. म्हणजे केंद्राच्या महसुलातील ४२ टक्के इतकाच वाटा राज्यांना मिळेल. त्यात शेवटच्या टप्प्यावर एक टक्क्याचा बदल झाला. कारण जम्मू-काश्मीर आणि लडाख हे नवे केंद्रशासित प्रदेश जन्मास येणे. महसूल वाटपात बदल न होणे हे एका अर्थाने स्वागतार्ह निश्चितच. कारण त्यामुळे संबंधितांना नव्याने समीकरणे बांधावी लागणार नाहीत. आहे त्या व्यवस्थेत काही एक प्रकारचे सातत्य राहील.पण त्याच वेळी राज्यांच्या महसूलवृद्धीच्या मागण्यांकडेही दुर्लक्ष होत राहील, हेदेखील विसरता नये. संघराज्यीय व्यवस्थेसाठी ही बाब महत्त्वाची ठरते. तीन वर्षांपूर्वी काही अर्थतज्ज्ञांनी उत्तर प्रदेशातील गरीब शेतकऱ्यांचा भार तमिळनाडू वा प्रगत दक्षिणी राज्ये कसा उचलतात हे साधार दाखवून दिले होते. याचा अर्थ असा की, अर्थदृष्ट्या 'बिमारू' ठरलेल्या (बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान आणि उत्तर प्रदेश) या राज्यांच्या महसुलातील घट 'श्रीमंत' अशा दक्षिणी आणि महाराष्ट्रासारख्या राज्यांना भरून काढावी लागते. या विधानात तथ्य नाही असे अजिबात नाही. वस्तू/सेवा करानंतरही या अशा विषम रचनेस एक प्रकारचे बळच मिळाले. 'उत्पादक' राज्यांनी- म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, पंजाब, तमिळनाडू आदी- कमवायचे आणि ते केंद्राने 'सेवा'धारी बिहार, उत्तर प्रदेश आदी राज्यांत वाटत राहायचे. एकत्र कुटुंब पद्धतीत काही वेळा कर्तृत्ववान आणि तुलनेने कमी कर्तृत्ववान वा अगदीच डफर भावांत उत्पन्न वाटपावरून जो वाद होतो, तसेच हे. त्यामुळे महाराष्ट्र आदी राज्यांच्या तुलनेत केंद्राकडून तुलनेने गरीब राज्यास सढळहस्ते मदत होते, हे सत्य.परिस्थिती उत्तम असताना याबाबत कोणी फारशी कुरकुर करीत नाही. काटकसरीची वेळ आल्यास मात्र लगेच तुझे-माझे सुरू होते. वस्तू/सेवा कराबाबत सध्या जी तक्रार होते, त्यास ही पार्श्वभूमी आहे. वित्त आयोगाने केंद्र आणि राज्यांतील महसूल वाटपात फार बदल न केल्याने हा तक्रारीचा सूर तारस्वरात निघण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, पुढील पाच वर्षांत केंद्राकडून उत्तर प्रदेशास ८.५५ लाख कोटी रु. मिळतील. बिहारसाठी ही रक्कम ४.७८ लाख कोटी असेल, तर पश्चिम बंगालच्या पदरात ४.०४ लाख कोटी रु. पडतील. आपल्या शेजारी मध्य प्रदेशास या काळात ३.८२ लाख कोटी रुपयांचा लाभ होईल. या तुलनेत महाराष्ट्र कित्येक पटींनी अर्थउद्योगात प्रबळ. पण तरीही महाराष्ट्रास मिळणारा करवाटा फक्त ३.३७ लाख कोटी रु. इतकाच असेल. अशी अनेक उदाहरणे देता येतील. त्यामुळे महाराष्ट्रावर अधिक काटकसरीची वेळ आल्यास हा मुद्दा केंद्र आणि राज्य संबंधातील राजकारणाच्या केंद्रस्थानी येणार हे उघड आहे. तसेच पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम अशा काही राज्यांत आगामी काळ हा निवडणुकांचा आहे. तेव्हा ही बाब प्रचारातील आगीत तेल ओतू शकते. कारण अर्थकारणातील संख्या या राजकारणातील शब्दांच्या मुळाशी असतात. त्यात आपल्याकडे काही राज्यांत अधिक मागास कोण अशी स्पर्धा हिरिरीने लढली जाते. याची उदाहरणे म्हणजे बिहार आणि पश्चिम बंगाल. या दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आपापल्या राज्यांसाठी 'विशेष दर्जा'ची मागणी वारंवार केली. असा 'विशेष दर्जा' मिळाला की केंद्राकडून विकासासाठी मदतीचा ओघ वाहू लागतो. म्हणून असा दर्जा देण्याचे गाजर राजकीय समीकरणांत नेहमी दाखवले जाते. भाजपपासून तृणमूल ममता दूर जाण्यामागे हे कारण होते आणि निधर्मी नितीश भाजप कळपात शिरण्यामागे हे कारण आहे. या दोन्ही राज्यांना असा दर्जा मिळालेला नाही आणि तो मिळूही नये. पण तो देण्याच्या आश्वासनावर राजकीय फोडाफोडी होत असते. या जोडीला आणखी दोन मुद्दे केंद्र आणि राज्य संबंधात या आयोगाच्या अनुषंगाने वादग्रस्त ठरण्याचा दाट संभव आहे.यातील पहिला मुद्दा थेट शहरांना केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्याचा. केंद्रीय करांतील ३.५४ टक्के वाटा तूर्त विविध शहरांत राबवल्या जाणाऱ्या अभियानार्थ खर्च होतो. ते प्रमाण ४.३१ टक्क्यांवर नेण्याची शिफारस हा वित्त आयोग करतो. विद्यमान व्यवस्थेत या सूत्रानुसार विविध शहरांना २०१५-१६ ते २०१९-२० या पाच वर्षांत ८७ हजार कोटी रु. मिळाले. नव्या सूत्राने २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांत सुमारे दोन लाख कोटी रु. मिळतील. आगामी कालखंडात शहरांपुढील आव्हाने वाढणार हे सांगण्यास तज्ज्ञांची गरज नाही. पण या शहरांना संबंधित राज्य सरकारांना डावलून अधिकाधिक मदत मिळत गेल्यास राज्यांच्या शहर व्यवस्थापनांच्या अधिकारांस कात्री लागणार. म्हणजे अनेकानेक शहरे मदतीसाठी केंद्रावरच अधिकाधिक अवलंबून राहू लागतील. आपल्या घरच्या चिरंजीवास शेजारचा पोसत असेल तर त्यातून तणाव निर्माण होणे अपरिहार्य असते.दुसरा मुद्दा विविध करांवर लावल्या जाणाऱ्या अधिभाराचा. पुरेशा उत्पन्नासाठी आसुसलेले केंद्र सरकार अलीकडे अधिकाधिक अधिभार लावू लागले आहे. निर्मला सीतारामन यांच्या आताच्या अर्थसंकल्पातही हे अधिभारसत्र सुरूच आहे. या अधिभारामागील लबाडी अशी की, त्यातून येणारी रक्कम ही कर उत्पन्नात गणली जात नाही. याचाच साधा अर्थ असा की, हे उत्पन्न करांत मोजलेच जात नसल्याने त्याचा वाटा राज्यांना देण्याचा प्रश्न येत नाही. म्हटल्यास ही लबाडी ठरते आणि तसे म्हणणे काहींसाठी अडचणीचे असल्यास या मार्गाचे वर्णन चलाखी असे होईल.




असो.या वित्त आयोगाचा तपशील जसजसा उघड होईल तसा याबाबतच्या महाभारतास रंग चढेल. वाटणी, मग ती घरची असो वा देशाच्या महसुलाची, सोपी नसतेच. वाटणी आणि वाटोळे यांचे नाते जवळचे आहे. ते लक्षात घेऊन हा प्रश्न हाताळला जावा, इतकेच.

# इंडियन नेव्हीच्या अधिकाऱ्याची निर्घुण हत्या

वरिष्ठांकडून मिळालेल्या माहितीनुसार वेवजी गाव ते बैजलपाडा या रस्त्यावरती दुपारच्या सुमारास एका युवकाला जळण्याच्या जखमासहीत लोकांनी पाहिले. त्या लोकांनी घोलवड पोलीस ठाण्याला कळविले. त्यानुसार घोलवड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सदर ठिकाणी पोहोचले आणि त्या युवकाला उपचाराकरिता कॉटेज हॉस्पिटल डहाणू येथे दाखल करण्यात आले. अधिक उपचाराकरिता आय.एन.एस अश्विनी हॉस्पिटल मुंबई येथे दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव सुरजकुमार मिथिलेश दुबे वय-२७ वर्ष असून ते राहायला राज्य झारखंड येथील रहिवासी होते. सुरज कुमारी इंडियन नेव्ही मध्ये लीडिंग सी मॅन या पदावर काम करत होते. त्यांची आय.एन.एस. अग्रीनी कोईमतूर तामिळनाडू येथे पोस्टिंग झाली होती. सुरजकुमार दुबे यांच्या जबाबावरून दिनांक- १/१/२०२१ ते १/२/२०२१ पर्यंत ती रजेवर होते. दिनांक- ३०/१/२०२१ रोजी सुट्टी संपवून ते रांची येथून सकाळी ८.०० वाजताच्या दरम्यान विमानाने बसून चेन्नई विमानतळावर पोहचले. विमानतळाच्या बाहेर आल्यावर ३ अज्ञात इसमांनी सुरज कुमार यांना रिव्हॉल्व्हरचा धाक दाखविला व त्यांच्याकडील पाच हजार रुपये किमतीचा मोबाईल जबरीने चोरून घेतला. सुरजकुमार यांना सफेद रंगाच्या एस.यू.व्ही गाडी मधून कोंबून त्यांचे अपहरण केले आणि त्यांना ३ दिवस चेन्नई येथे कोंडून ठेवले. दिनांक. ४/२/२०२१ रोजी सायंकाळी चेन्नई येथे गाडीत बसविण्यात आले. त्यानंतर पुढील घटनाक्रम त्यांना समजत नाही. दिनांक-५/२/२०२१ रोजी सकाळी घोलवड जवळील वेवजी गावाच्या बैजलपाडा जंगलात नेले व त्यानंतर त्यांच्या अंगावर पेट्रोल ओतून जाळून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. अशा आशयाची फिर्याद दिल्याने घोलवड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०६/२०२१ कलम ३०७, ३६४(अ), ३९२,३४२,३४ भारतीय हत्यार अधिनियम ३,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. दरम्यान जखमी सुरजकुमार यांचा मृत्यू झाल्याने



भा.द.वि.स.कलम ३०२ हे कलम सदर गुन्ह्यातील वाढविण्यात आलेली आहे. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्ह्याचा तपास श्री. धनाजी नलावडे उपविभागीय पोलीस अधिकारी डहाणू, विभाग डहाणू यांच्याकडे देण्यात आले आहे. सदर तपास दरम्यान पुढील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१) दिनांक-३१/१/२०२१ रोजी सुरज कुमार यांच्या वडिलांनी सुरज कुमार यांचा फोन बंद लागल्याने त्यांनी स्थानिक पोलीस ठाणे चहलपूर जिल्हा झारखंड येथे हरविलेबाबत तक्रार दिलेली आहे. तसेच त्यांनी आय एन एस अग्रीनी कोईमतुर येथील कमांडट ऑफिसर श्री.अशोक रॉय यांना सुद्धा माहिती दिली आहे. त्यावरून इंडियन नेव्हीच्या नव्हल पोलीसांनी देखील तपास सुरू केला आहे.

२) नेव्ही व झारखंड पोलीसांकडून तपास सुरू असताना असे लक्षात आले की, सुरजकुमार यांच्या कुटुंबाला सुरज कुमार कडे दोन मोबाईल नंबर असल्याचे माहित होते. तपासादरम्यान सुरज कुमार यांच्याकडे आणखीन तिसरा मोबाईल नंबर असून त्यावर दिनांक- १/२/२०२१ सुरज कुमार यांचा चुलत भाऊ श्री.चंदन कुमार यांनी फोन केला होता व तो दिनांक. १/२/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत चालू असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर तो फोन देखील बंद करण्यात आलेला आहे. तसेच त्या मोबाईलवरून सुरज कुमार यांनी अस्था कंपनी भोपाळ व मुंबई आणि एंजल कंपनी मुंबई शेअर मार्केट कंपनी मध्ये सतत दोन दिवस मोठ्या प्रमाणात व्यवहार केलेला आहे.

३)सुरज कुमार यांच्या बँक खात्याची माहिती घेतली असता त्यांचे पगार खाते हे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कुलाबा मुंबई येथील असून त्या खात्यामध्ये आतापर्यंत ८,४३,००/- रुपयाचे वैयक्तिक कर्ज घेतल्याचे निष्पन्न झालेले आहे.

या खात्यामधून सातत्याने शेअर ट्रेडिंग झालेले असून शेवटी फक्त ३०२ रुपये शिल्लक आहेत. या पगार खात्या व्यतिरिक्त स्टेट बँक ऑफ इंडिया आय.एन.एस. नेव्ही मुंबई येथे दुसरे बँक खाते असल्याचे निष्पन्न झाले आहे. या खात्यांमध्ये पाच हजारापेक्षा जास्त रक्कम होती. सदर खात्यातून दिनांक- १/२/२०२१ रोजी चेन्नई येथील एका ए.टी.एम मधून पाच हजार रुपये काढले ते निष्पन्न झाली आहे.

व या खात्यामध्ये अखेर फक्त ९० रुपये शिल्लक आहे. दोन्ही खात्यावरती मोठ्या प्रमाणात कर्ज असल्याचे दिसून येत आहे.

४)सुरज कुमार यांनी आय. एन. एस. नेव्ही तेथील त्यांचे सहकारी यांच्या कडून सहा लाखापर्यंत हॅन्ड लोन घेतले आहे. त्याचे सहकारी घेतलेल्या हॅन्ड लोनची सुरजकुमार कडे मागणी करीत होते. परंतु अद्याप पावेतो त्यांनी दिलेली नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

५) दिनांक. १५/१/२०२१ रोजी सुरज कुमार यांचा साखरपुडा झाला असून सासरकडील लोकांनी एकूण नऊ लाख रुपये बँक खात्यामध्ये व इतर स्वरूपात दिलेले आहे.

सदर तपासाचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री.दत्तात्रय शिंदे पोलीस अधीक्षक पालघर यांच्या आदेशान्वये श्री. प्रकाश गायकवाड अपर पोलीस अधीक्षक पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १० पथके तयार केलेली आहे. प्रत्येक पथकामध्ये एक अधिकारी व दहा अंमलदार यांचा समावेश केलेला आहे. सदरची पथके महाराष्ट्रात व भारतातील इतर राज्यात तपासकामी परवाना करून सखोल तपास करीत आहेत.

## पुण्यातला धक्कादायक प्रकार; हात-पाय बांधून शेजारी राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार

पुण्यातील पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धक्कादायक म्हणजे, अल्पवयीन मुलीचे दोरीने हात-पाय आणि ओढणीने तोंड बांधून 29 वर्षीय नराधम आरोपीने बलात्कार केल्याचं भोसरी पोलिसांनी सांगितलं.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभाग कार्यालय क्र.१**

**जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/बी/५/३००/५२६५/२०२०-२१ दिनांक :-२/२/२०२१**

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील क्षेत्रफल ३३३, फ्लैट ४३, झोन क्र.बी-०८ येथील मालमत्ता क्रमांक **बी०८००००६७३०००** असून **नाटक हाउस बकोक स्ट्रीट** या इमारतीस सन २०२०-२१ मध्ये **श्री कालमेट अंजेल रोड्रिक्स** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **पत्नी** या नात्याने **श्रीम. अर्चना कालमेट रोड्रिक्स/ सोनी कालमेट रोड्रिक्स** यांनी दिनांक: १५/१२/२०२० रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस - बाकोळ क्रॉस रोड
पश्चिमेस - वैशाली कॉम्पलेक्स बिल्डींग
दक्षिणेस - क्रॉस गार्डन चौक
उत्तरेस - लक्की अपार्टमेंट

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

## कट मारण्यावरुन हाणामारी



नाशिक, वाहनास कट मारल्यावरून वाहनचालकांमध्ये वाद होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. नुकत्याच समोर आलेल्या दोन घटनांपैकी एका घटनेत बस वाहकास मारहाण करण्यात आली तर, दुसऱ्या घटनेत महिलेचा विनयभंग करण्यात आला. महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या बस वाहकास मारहाण करणाऱ्या संशयिताचे नाव मोहम्मंद शोएब निसार शेख (२२, भंगारबाजार, बडा कब्रस्थानच्यामागे, भद्रकाली) असे आहे. या प्रकरणी अंकुश जामवंतराव काळे (३४, रा. दोंडईचा, जि. धुळे) यांनी तक्रार दिली. शहादा आगारात कार्यरत असलेले काळे हे बसचालक संदीपसमवेत बसने (एमएच २०, बीएल १५४६) नाशिक येथे प्रवाशी घेऊन आले. शनिवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास शिंगाडा तलावाजवळ दुचाकीवर आलेल्या संशयिताने बस थांबवली. 'आमच्या दुचाकीला कट का मारला' असे म्हणत फिर्यादी काळे यांना बसखाली खेचून मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच मुंबई नाका पोलिसांनी संशयित शेख यास अटक केली. दुसरी घटना महात्मानगर येथे घडली. या प्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार गंगापूर पोलिसांनी महिलांसह एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला. रेशम साबरा, जसप्रीत साबरा आणि वृंद पटेल असे संशयित आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार ती आपल्या मित्रासमावेत महात्मनगर येथून कारने जात असताना हा प्रकार घडला.

## दुहेरी हत्याकांड, 9 वर्षीय मुलीने सांगितली आपबीती; आधी चहा प्यायले, त्यानंतर...

**उत्तर प्रदेशातील गाझियाबादमधील दुहेरी हत्याकांडाचा काही तासांतच उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. हल्ल्यातून बचावलेल्या 9 वर्षीय मुलीने संपूर्ण हकिकत सांगितली.**



गाझियाबाद: नात्याला आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये घडली. पैशांच्या लालसेपोटी पुतणीच्या घरी गेलेल्या काकीने कुटुंबाला संपवण्याच्या प्रयत्न केला. हल्ल्यात महिलेचा आणि मुलीचा मृत्यू झाला आहे. तर तीन मुले मृत्युशी झुंज देत आहेत. घटनेनंतर काही तासांनी ९ वर्षांच्या मुलीने आपबीती सांगितली. तिने दिलेल्या माहितीच्या आधारे महिला आणि तिच्या साथीदाराला पोलिसांनी अटक केली आहे. घरातून लांबवलेले एक लाख रुपये आणि दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत.

सरिता विहारमध्ये घडलेल्या दुहेरी हत्याकांडाने गाझियाबाद जिल्हा हादरला. डॉली आणि अंशू यांच्या हत्येनंतर तीन मुलांवर प्राणघातक हल्ला केला. डॉलीची काकी उमा आणि तिचा साथीदार सोनू यांना या प्रकरणात अटक केली आहे. या प्रकरणात उमाच्या पतीचा हात आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉलीला १२ लाख रुपये मिळाले होते. याशिवाय घराचेही काही पैसे मिळाले होते, अशी माहिती उमाला मिळाली होती. पैशांच्या लालसेपोटी तिने त्यांच्या हत्येचा कट रचला. शनिवारी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास ती डॉलीच्या घरी गेली. तिची मुले गौरी, मिनाक्षी आणि रुद्र हे शिकवणी वर्गात होते. उमा आणि तिच्या साथीदारांनी आधी डॉलीसोबत बसून एकत्र चहा घेतला. त्यांच्यात गप्पा झाल्या. सोनूने त्यांच्या मुलांना एका खोलीत नेले. त्यांच्यासोबत डॉली आणि अंशू देखील होते. त्यानंतर घरात ठेवलेले पैसे आणि दागिने ते शोधू लागले.

पैशांची माहिती न दिल्याने अंशूला घातली गोळी

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींकडे चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी आधी डॉलीकडे पैशांबाबत विचारणा केली. त्याबाबत माहिती देण्यास त्यांनी नकार दिला. चिडलेल्या सोनूने अंशूला गोळ्या घातल्या. त्यानंतर डॉली घाबरली. तिने पैसे कुठे आहेत ते सांगितले. पैशांची माहिती मिळाल्यानंतर सोनूने डॉलीला गोळ्या घातल्या. मुले खोलीतच होती. त्याने मुलांवर गोळ्या झाडून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला. घटनेवेळी आरोपी महिला उमा ही बाहेरच होती. गोळी लागल्याने डॉली आणि अंशू जखमी झाले. त्यानंतर सोनूने त्यांच्यावर चाकूने वार केले. डॉलीची लहान मुलगी मिनाक्षी तिला वाचवण्यासाठी पुढे आली. आरोपीने तिचे केस पकडून तिला फेकून दिले. तिला जमिनीवर आपटले. ९ वर्षीय मुलगी गौरी ही जखमी झाली. मात्र, ती कशीबशी पलंगाखाली जावून लपली. मीनाक्षीवरही त्याने हल्ला केला. त्यानंतर सोनूने रुद्रवरही हल्ला केला. ते मृत झाल्याचे समजून आरोपी तेथून पळून गेले.

डॉलीचे सासरे काही वेळाने घरी पोहोचले. घरातील वस्तू अस्ताव्यस्त पडल्या होत्या. आजूबाजूचे लोक घरी धावून आले. घराच्या वरच्या मजल्यावर गेले असता, त्यांना धक्काच बसला. त्यांनी पोलिसांना माहिती दिली. जखमी मुलांना तात्काळ रुग्णालयात नेले. जखमी गौरीने घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर पोलिसांनी काही तासांतच आरोपींना अटक केली.

## बायकोसोबत तरुण फिरत होता, चिडलेल्या पतीने...

**पत्नीसोबत फिरणाऱ्या तरुणाला अडवून त्याला पट्ट्याने बेदम मारहाण केल्याची घटना पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, आरोपी पतीला अटक केली आहे.**



पुणे: बायकोसोबत का फिरतो, अशी विचारणा करून तिच्या पतीने आणि साथीदारांनी एका तरुणाला पट्ट्याने बेदम मारहाण केल्याची घटना विश्रांतवाडी परिसरात शनिवारी रात्री घडली. या प्रकरणी मारहाण करणाऱ्या तिघांवर विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, एकाला अटक केली आहे.

याबाबत शंतनू अशोक वावरे (वय २८, रा. धानोरी) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी मैत्रिणीच्या पतीला अटक केली आहे. तर, त्याचे साथीदार सनी (रा. विश्रांतवाडी) आणि इशान (वय ३३) यांचा शोध घेण्यात येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार शंतनू व आरोपीची पत्नी हे दोघे मित्र आहेत. शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास शंतनू हा त्याच्या मैत्रिणीसोबत घरी जात होता. त्यावेळी तिचा पती आणि मित्र तेथे आले. त्यांनी शंतनूला थांबवले. माझ्या बायकोसोबत का फिरतोस, अशी विचारणा आरोपीने केली. त्यानंतर शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

त्यावेळी आरोपीसोबत असलेल्या दोघांनी शंतनूला पकडून ठेवले. आरोपीने त्याला पट्ट्याने त्याला जबर मारहाण करून जखमी केले. त्यानंतर आरोपी निघून गेले. या प्रकरणी शंतनू याने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून, पतीला अटक केली आहे. तर, इतर दोघांचा शोध सुरू आहे.

## धक्कादायक! उपचारानंतर फी मागितली; रुग्णाने डॉक्टरचे बोट छाटले

**उपचारानंतर फी मागितली म्हणून रुग्णासह त्याच्यासोबत आलेल्या तरुणाने डॉक्टरला मारहाण केली. डॉक्टरांच्या हाताचे बोट छाटले. मध्य प्रदेशातील छिंदवाडामध्ये ही घटना घडली.**



छिंदवाडा: मध्य प्रदेशातील छिंदवाडामधील कुण्डीपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत शनिचरा बाजारात डॉ. एस. के. बिंद्रा यांच्या क्लिनिकमध्ये रात्री उशिरा दोन तरुणांनी तोडफोड केली. डॉ. बिंद्रा यांनी विरोध केला असता, तरुणांनी धारदार शस्त्राने त्यांच्या हाताचे बोट छाटले. दोघेही तरुण दारुच्या नशेत होते. या घटनेची माहिती मिळताच, पोलीस तेथे पोहोचले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नरसिंहपुरा रोड येथील रहिवासी विजय उइके आणि आकाश तिवारी हे डॉ. बिंद्रा यांच्या क्लिनिकमध्ये गेले होते. उपचार घेतल्यानंतर त्यांच्याकडे डॉ. बिंद्रा यांनी फी मागितली. जास्त पैसे घेतल्याचा आरोप तरुणांनी केला आणि शिवीगाळ सुरू केली. डॉक्टरांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी गोंधळ घातला.

तरुणांनी त्यांना धक्काबुक्की केली. त्यानंतर क्लिनिकमध्ये तोडफोड केली. डॉक्टरांना मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच, पोलीस तेथे पोहोचले. दोन्ही आरोपींना त्यांनी ताब्यात घेतले. आरोपींविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंडापाव विक्रेत्यासोबत वाद झाल्यानंतर गरम तेल हातावर पडल्याने विजय हा जखमी झाला. विजयला घेऊन आकाश तिवारी हा बिंद्रा यांच्या क्लिनिकमध्ये गेला. डॉक्टरांनी उपचार केल्यानंतर त्यांनी फी मागितली. मात्र, ती जास्त असल्याचे सांगून त्यांनी डॉक्टरांशी वाद घातला.

त्यांनी डॉक्टर बिंद्रा यांच्या हाताचे बोट छाटले. बिंद्रा यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

## दोन वर्षांपासून 'पॉर्न'चा धंदा

**वेबसिरीज, शॉर्ट फिल्म तसेच टीव्ही मालिकांमध्ये काम देतो असे सांगून तरुणींचे 'पॉर्न' व्हिडीओ बनवणारी प्रोडक्शन कंपनी एक अभिनेत्रीच चालवत असल्याची माहिती समोर आली आहे.**



मुंबई, वेबसिरीज, शॉर्ट फिल्म तसेच टीव्ही मालिकांमध्ये काम देतो असे सांगून तरुणींचे 'पॉर्न' व्हिडीओ बनवणारी प्रोडक्शन कंपनी एक अभिनेत्रीच चालवत असल्याची माहिती समोर आली आहे.

गेहाना वशिष्ठ असे या मॉडेल, अभिनेत्रीचे नाव असून तिला याप्रकरणात अटक करण्यात आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या प्रोडक्शन कंपनीने जवळपास शंभर अश्लील चित्रफिती ॲप आणि वेबसाइटवर अपलोड केल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाच्या पथकाने गुरूवारी मढ बीचवरील एका बंगल्यात छापा टाकून पॉर्न फिल्म तयार करणाऱ्या कंपनीचा पर्दाफाश केला. पोलिसांनी छापा टाकला त्यावेळी एका अश्लील व्हिडीओचे चित्रीकरण सुरू होते. पोलिसांनी बंगल्यातून यासिन बेग खान ऊर्फ रोवा, प्रतिभा नलावडे, मोनू जोशी, भानुसुराम ठाकूर आणि मोहमद आसिफ या पाच जणांना अटक केली आहे. हे सर्व बॉलिवूड क्षेत्राशी संबंधित असून अभिनेता, फॅशन डिझायनर आणि कॅमेरामन आहेत.

या पाच जणांची सखोल चौकशी केली असता अभिनेत्री गेहाना वशिष्ठ अशी नाव पुढे आले.

हिंदी आणि तेलगू सिनेमा आणि विशेषकरून जाहिरातींमध्ये झळकणाऱ्या गेहाना हिने अभिनयाच्या आड गेल्या दोन वर्षांपासून हा धंदा चालविला होता. गेहाना अभिनय क्षेत्रात नशीब आजमावू पाहणाऱ्या तरुणांना आकर्षित करण्यासाठी जाहिरातबाजी करत होती. मोठ्या बजेटचे सिनेमा किंवा वेबसिरीजमध्ये भूमिका देतो असे सांगून त्यांच्याकडून करारावर स्वाक्षरी करून घेतली जाई. हा करार मोडल्यास कारवाई केली जाईल, अशी धमकी देऊन तरुणींना भाड्याने घेतलेल्या बंगल्यात नेऊन त्यांच्या अश्लील चित्रफीत तयार केल्या जात होत्या, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

गेहाना आणि तिच्या कंपनीने आतापर्यंत ८७ अश्लील व्हिडीओ अपलोड केले असून ही संख्या वाढण्याची शक्यता असल्याचे संबंधित अधिकाऱ्याने सांगितले. ॲप आणि वेबसाइटवर चित्रफीत पाहण्यासाठी सब्स्क्रप्शन आवश्यक होते. यासाठी ग्राहकाला दोन हजार रुपये भरावे लागत होते. अशाप्रकारे सब्स्क्रिप्शनच्या माध्यमातून गेहाना आणि कंपनीने लाखो रुपये कमविले आहेत. पोलिसांना आतापर्यंत तीन बँक खात्यांचा तपशील हाती लागला असून यातून ३६ लाख रुपये सब्स्क्रप्प्शनमधून कमवले असल्याचे उघड झाले आहे. भारतीय आणि हिंदी व्हिडीओंना अधिक मागणी असल्याचे चौकशीत आरोपींनी सांगितले.

## साताऱ्यात मंगळसूत्र हिसकावले



औरंगाबाद, चोरट्यांनी देवदर्शनासाठी निघालेल्या महिलेचे मंगळसूत्र हिसकावल्याची घटना रविवारी दुपारी कांचनवाडी ते सातारा गाव या रस्त्यावर घडली. या प्रकरणी सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या आठवड्यातील ही चौथी घटना असून, काही दिवसांपासून साखळीचोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पुण्याहून आलेल्या ही २१ वर्षीय महिला रविवारी दुपारी एक वाजता आई, भाऊ आणि मुलासोबत दुचाकीवरून कांचनवाडी ते सातारा गावाच्या रस्त्यावरून देवदर्शनासाठी जात होती. दोन अनोळखी चोरटे दुचाकीवरून आले. या दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या एकाने २१ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन असलेले मंगळसूत्र हिसकावले. या मंगळसुत्राची किंमत अंदाजे ६० हजार रुपये आहे. चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर या महिलनेने आरडाओरड केली, तोपर्यंत दुचाकीस्वार पसार झाले होते. या प्रकरणी सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस उपनिरीक्षक शिरसाट पुढील तपास करीत आहेत. ही घटना घडल्याची माहिती मिळाल्यानंतर सातारा पोलिस काही वेळात घटनास्थळी पोहोचले. यानंतर पोलिस उपायुक्त निकेश खाटमोडे पाटील, तसेच सहाय्यक पोलिस आयुक्त निशीकांत भुजबळ यांनी घटनेची माहिती घेतली. तसेच या चोरीच्या प्रकरणात आरोपी कोणत्या दिशेने पळाले, त्याचे सीसीटीव्ही फुटेज मिळवून त्या संदर्भात कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. शहरात नोव्हेंबर महिन्यापर्यंत १३ मंगळसूत्र चोरीच्या घटनांची नोंद करण्यात आली होती. यात दोन ते तीन प्रकरणात चोरटयांना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. मात्र अन्य प्रकरणात आरोपींचा शोध सुरू होता. या वर्षीच्या सुरवातीला आतापर्यंत शहरात साधारणत: चार ठिकाणी महिलांचे मंगळसूत्र हिसकावले असून एका वृद्ध व्यक्तीच्या सोनसाखळी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.

## सरकारी वकील पत्नीसह बाहेर गेले होते; परतल्यानंतर बंगल्यातील दृश्य बघून हादरले



नगर जिल्हा न्यायालयात कार्यरत अतिरिक्त सरकारी वकील गोरक्ष मुसळे यांचा बंगला भरदिवसा फोडून चोरट्यांनी ५० तोळे सोने चोरून नेले. वकील मुसळे पत्नीसह काही तासांसाठी बाहेर गेले होते. तेथून परत येईपर्यंत चोरट्यांनी डाव साधला.नगर-पुणे महामार्गावरील कायनेटीक चौकातील रविश कॉलनीमध्ये मुसळे यांचा बंगला आहे. त्यांच्या पत्नीच्या मैत्रीणीचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या नातेवाइकांना भेटण्यासाठी मुसळे दाम्पत्य रविवारी दुपारी बाहेर गेले होते. जाताना त्यांनी बंगल्याची चावी मोलकरणीकडे दिली होती. मोलकरीण नेहमीप्रमाणे दोनच्या सुमारास तेथे आली. तासभर घरकाम करून कुलूप लावून ती निघून गेली.

सायंकाळी सहाच्या सुमारास मुसळे परतले. त्यावेळी गेटचे कुलूप लावलेले होते. मात्र, बंगल्याच्या मुख्य दरवाजाचे कुलूप उघडत नव्हते. त्यामुळे मुसळे यांना संशय आला. त्यांनी पाहणी केली असता कुलुपासोबत छेडछाड झाल्याचे आढळून आले. याशिवाय बंगल्याचा मागील बाजूचा दरवाजा तुटलेला आढळून आला. यावरून चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी पोलिसांना बोलाविले. चोरट्यांनी मागील दार तोडून आत प्रवेश केल्याचे स्पष्ट झाले. बेडरुममधील कपाटातून सुमारे ५० तोळे सोन्याचे दागिने चोरांनी लंपास केले.

बांगड्या, सोनसाखळी, ब्रेसलेट, मोहनमाळ, कानातील झुबे, नथ, मंगळसूत्र, नेकलेस, राणीहार चोरीला गेले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास केला. चोरट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र, ते हाती लागले नाहीत. भरववस्तीत असलेला बंगला दिवसा फोडण्याचे धाडस चोरट्यांनी केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. नदीच्या बाजूला असलेल्या या कॉलनीत रात्रीच्या सुमारास घडफोडीचे प्रकार घडतात.

## मध्यरात्रीची वेळ; 'तो' तरुण दुचाकीवरुन घरी जात होता, अचानक...

मुंबई: मुंबईत ३६ वर्षीय तरुणावर प्राणघातक हल्ला झाला. दुचाकीवरून घरी जात असताना, पाच ते सहा जणांनी त्याच्यावर हल्ला केला. यात तरूण जखमी झाला आहे. परळ येथील एका हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर ही धक्कादायक घटना घडली. अभिजीत शिंदे (वय ३६) हा तरूण मुंबईतील परळ येथील एका रुग्णालयासमोरील रस्त्यावरून मध्यरात्री दीडच्या सुमारास दुचाकीने आपल्या घरी निघाला होता. त्याचवेळी पाच ते सहा जणांनी जुन्या वादातून त्याला अडवले. त्याला शिवीगाळ केली. पेव्हर ब्लॉक आणि बियरची बाटली त्याच्या डोक्यात फोडली. यात अभिजीत हा जखमी झाला आहे. या घटनेनंतर अक्षय महाडीक या तरुणाने काळाचौकी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपींविरोधात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून, तिघे अद्याप पोलिसांच्या हाती लागले नाहीत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## दोन महागडे मोबाइल दुकानातून लंपास




पुणे,खरेदीच्या निमित्ताने मोबाईल शॉपीमध्ये आलेल्या चोरट्याने एक लाख तीन हजार रुपयांचे दोन मोबाइल चोरून नेल्याची घटना गुडलक चौकातील मोबाइल एक्स्प्रेस शॉपमध्ये घडली. या प्रकरणी डेक्कन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गणेश पाटील (वय ३२, रा. वारजे जकात नाका) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश पाटील यांची डेक्कन परिसरातील सागर आर्केड इमारतीमध्ये मोबाइल शॉपी आहे. दोन दिवसांपूर्वी संध्याकाळी सातच्या सुमारास एक व्यक्ती दुकानात मोबाइल खरेदी करण्यासाठी आली होती. त्या व्यक्तीने गणेश यांना मोबाइल खरेदी करायचा असल्याचे सांगून मोबाइल दाखविण्यास सांगितले. त्यांनी मोबाइल दाखविल्यानंतर आरोपीने त्यांची नजर चुकवून 'वन प्लस प्रो' कंपनीचे एक लाख ३ हजार रुपये किंमतीचे दोन मोबाइल चोरून नेले. दुकानात आलेल्या व्यक्तीने तोंडाला मास्क लावलेले होते. आरोपी मोबाइल घेऊन गेल्यानंतर त्यांना हा प्रकार लक्षात आला. त्यानंतर त्यांनी पोलिसांना घटनेची माहिती दिली. या प्रकरणी पोलिस उपनिरीक्षक किशोर शिंदे तपास करीत आहेत.

## संतप्त नागरिकांकडून गुंडाची ठेचून हत्या

नागपूर, गुंडाच्या सततच्या त्रासाला कंटाळून संतप्त नागरिकांनी त्याची चाकू व दगडाने ठेचून हत्या केली. ही थरारक घटना रविवारी रात्री आठच्या सुमारास नागपूर येथील शांतिनगरमधील नारायण पेठ येथे घडली. या घटनेने परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण आहे. विजय वाघधरे (वय २३, रा. प्रेमनगर) असे मृत गुंडाचे नाव आहे. शांतिनगर पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे ही घटना घडल्याची चर्चा असून, विजयची हत्या ही अक्कू यादव हत्याकांडाची पुनरावृत्ती असल्याचे बोलले जाते. विजयविरुद्ध गंभीर दुखापतीसह अनेक गुन्हे दाखल आहेत. तो परिसरातील नागरिक, दुकानांदारांना त्रास द्यायचा. रविवारी सायंकाळी विजयचा परिसरातील उदय व संजूसोबत वाद झाला आणि त्यांना मारहाण केली. त्यानंतर दोघांनी पोलिसात तक्रार दिली. दरम्यान, विजयने उदय व संजूच्या घरासमोर शिवीगाळ सुरू केली. या वेळी परिसरातील नागरिक तेथे आले आणि त्यांनी विजयवर हल्ला केला. चाकूने त्याच्यावर सपासप वार केले. दगडाने ठेचून त्याची हत्या केली. घटनेनंतर सुनील व पाच ते सहा नागरिक फरारी झाले.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898